# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः04.09.2025** **वारःगुरुवार**

---

1. मध्यमवर्गीयांच्या दैनंदिन वापरातील अनेक वस्तूंवरचे कर कमी करण्याचा जीएसटी परिषदेचा निर्णय
2. ओबीसी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती
3. पुणे मेट्रोच्या दोन स्थानकांसह राज्यातल्या विविध पायाभूत प्रकल्पांना मंत्रिमंडळाची मंजुरी आणि
4. मराठवाडा मुक्तीदिनी बीड - अहिल्यानगर रेल्वेचा प्रारंभ

**कर कपात**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या वस्तू आणि सेवा कर परिषदेच्या छप्पनाव्या बैठकीत अनेक वस्तूंवरील कर कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला. सीतारामन यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. केशतेल, साबण, शाम्पू , दातांचा ब्रश, दंतपेस्ट, सायकल, स्वयंपाकघरातील वस्तूंसह अन्य काही वस्तूंवर आता केवळ 5 टक्के कर असेल. तर अति-उच्च तापमानातील दूध, पनीर, सर्व प्रकारचे भारतीय ब्रेड करमुक्त असतील. वातानुकूलन यंत्र, दूरचित्रवाणी संच, खरकटी भांडी धुण्याचं यंत्र, लहान कार, मोटरसायकल यांच्यावरील जीएसटी 28 टक्क्यांवरुन 18 टक्के करण्यात आला आहे. सर्व प्रकारच्या कृषी उपकरणांवरील कर देखील आता 12 वरून 5 टक्के करण्यात आला आहे. या महिन्याच्या 22 तारखेपासून ही करकपात लागू होईल असं सीतारामन यांनी सांगितलं.

**ओबीसी उपसमिती**

ओबीसी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती नेमण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत हा निर्णय झाल्याचं मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितलं. चंद्रशेखर बावनकुळे या उपसमितीचे अध्यक्ष असतील. छगन भुजबळ, गणेश नाईक, गुलाबराव पाटील, संजय राठोड, पंकजा मुंडे, अतुल सावे, दत्तात्रय भरणे यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव या उपसमितीचे सचिव असतील.

**राज्य मंत्रिमंडळ**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अन्य काही महत्त्वपूर्ण निर्णयही काल घेण्यात आले. राज्यात अनुसूचित जमातीतल्या इयत्ता नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेऐवजी केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करायला मंजुरी देण्यात आली. संजय गांधी निराधार योजना तसंच श्रावणबाळ योजनेतल्या दिव्यांगांच्या अर्थसहाय्यात 1 हजार रुपयांची वाढ करण्यात आली असून लाभार्थ्यांना आता दरमहा दीड हजाराऐवजी अडीच हजार रुपये मिळणार आहेत.

मुंबईसाठी 238 एसी लोकल खरेदी करण्याकरता 2 हजार 413 कोटी रुपयांचा निधी द्यायला सरकारनं मंजुरी दिली. पुणे-लोणावळा दरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गिकेला आणि मुंबईत आणिक डेपो- वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया या मेट्रो मार्गिका प्रकल्पाला मंत्रिमंडळानं मान्यता दिली. पुणे मेट्रोवर बालाजीनगर आणि बिबवेवाडी ही दोन नवीन स्थानकं होणार आहेत. हिंगणा तालुक्यात राज्य सरकार नवीन नागपूर वसवणार आहे. त्यात आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वित्तीय केंद्र उभारण्यात येईल. लंडनमधल्या महाराष्ट्र मंडळाच्या इमारतीत छत्रपती शिवाजी महाराज वैश्विक मराठी भाषा केंद्र उभारण्याचा निर्णयही राज्य मंत्रिमंडळानं घेतला. कारखाने अधिनियम 1948 च्या कलम 54 आणि महाराष्ट्र दुकाने आणि आस्थापना अधिनियम 2017 मध्ये सुधारणा करायला मंजुरी देण्यात आली. यामुळं कारखान्यातले दैनंदिन कामाचे तास 9 वरून 12 तासांपर्यंत होणार आहेत.

**<u>बीड रेल्वे</u>**

बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडीचा प्रारंभ मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली काल मुंबईत झालेल्या बैठकीत घेण्यात आला. बीड ते परळी वैजनाथ या रेल्वे मार्गातील अडथळे दूर करून गतीनं काम पूर्ण करण्याच्या सूचनाही पवार यांनी दिल्या. ऐकूया अधिक वृत्तांत...

**रेल्वेमार्गापासून अनेक मैल दूर असलेलं बीड शहर आता लवकरच रेल्वेच्या नकाशावर येणार आहे. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी बीड ते अहिल्यानगर ही बहुप्रतीक्षित रेल्वे सुरू होणार आहे. या रेल्वे मार्गाची एकंदर लांबी जवळजवळ 261 किलोमीटर आहे. यासाठी 1 हजार 822 पूर्णांक 168 हेक्टर भूसंपादन करण्यात आलं. या रेल्वे मार्गाच्या खाली 130, तर रेल्वे मार्गाच्या वर 65 पूल आहेत. केंद्र आणि राज्य शासनानं एकत्रितपणे उभारलेल्या या प्रकल्पाचा खर्च 4 हजार 805 कोटी रुपये आहे. या रेल्वे मार्गाच्या माध्यमातून बीडमधील नागरीकांचं गेल्या अनेक वर्षांपासूनचं स्वप्न पूर्ण होणार असून बीड शहर आणि जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीनं ही रेल्वे एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.**

**<u>सेवा पंधरवडा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त 17 सप्टेंबरपासून 2 ऑक्टोबरपर्यंत सेवा पंधरवडा देशभरात साजरा करण्यात येणार आहे. या संदर्भात केंद्रीय युवा कार्य आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविय यांनी काल विविध राज्यांच्या क्रीडा मंत्र्यांशी दूरस्थ माध्यमातून संवाद साधला. ऐकुया अधिक वृत्तांत...

**युवकांचं आरोग्य सुदृढ ठेवणे आणि त्यांच्यात राष्ट्रप्रेम जागवणे ही काळाची गरज आहे. त्या अनुषंगानं या सेवा पंधरवड्यात 21 सप्टेंबर रोजी 75 ठिकाणी नमो मॅरेथॉनचं आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय युवा कार्य आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी दिली. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150व्या जयंतीनिमित्त 31 ऑक्टोबर ते 15 नोव्हेंबर या कालावधीत एकतेचा संदेश देणाऱ्या पदयात्रेचं आयोजन देशभर करण्यात येणार आहे. याअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यांत तीन दिवस एकता, राष्ट्रप्रेम, एक भारत श्रेष्ठ भारत आणि विकसित भारत असे संदेश देणाऱ्या पदयात्रा होणार आहेत. देशभरातील 100 सामाजिक आणि अध्यात्मिक संस्थांच्या सहभागातून नशामुक्त भारत अभियानही या पंधरवड्यात राबविण्यात येणार आहे. तसंच खासदार क्रीडा महोत्सवाचं आयोजनही करण्यात येणार आहे. राज्यांनी यात सक्रिय सहभाग नोंदवावा, असं आवाहन मनसुख मांडविया यांनी केलं आहे.**

**<u>मराठा आरक्षण</u>**

मराठा आरक्षणविषयक जीआरबद्दल आपल्या मनात संभ्रम असून याचा अभ्यास करण्यासाठी हा जीआर कायदेतज्ञांकडं दिला आहे, ओबीसींचं नुकसान होईल असं काही या जीआरममध्ये असेल तर उच्च न्यायालयात आव्हान देऊ, असं मंत्री छगन भुजबळ यांनी काल मुंबईत बातमीदारांना सांगितलं.

दरम्यान हैदराबाद गॅझिटियर लागू करण्याचा निर्णय हा कायद्याच्या चौकटीत घेतला असून कुणबी प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया सुलभ होणार असल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मुंबईत वार्ताहरांना सांगितलं. यामुळं ओबीसी प्रवर्गाचं नुकसान होणार नाही. नाराज ओबीसी नेत्यांसोबत मुख्यमंत्री आणि आपण चर्चा करू, वस्तुस्थिती समजल्यानंतर त्यांची नाराजी दूर होईल, असं शिंदे म्हणाले.

**<u>मुंबई उच्च न्यायालय</u>**

मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मुंबईत सार्वजनिक संपत्तीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याच्या आरोपांबाबत मनोज जरांगे आणि आंदोलनाच्या आयोजकांनी प्रतिज्ञापत्र सादर करावं, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयानं काल दिले. प्रभारी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या खंडपीठानं या नुकसानाबद्दल आंदोलक आणि महाराष्ट्र सरकारला प्रश्न विचारले.

**प्रभाग रचना**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काल राज्यातल्या काही महानगरपालिकांच्या प्रभाग रचना जाहीर करण्यात आल्या. **कोल्हापुरात** चार सदस्यीय 19 आणि पाच सदस्यीय 1 असे 20 प्रभाग निश्चित करण्यात आले आहेत. **धुळे** महापालिकेत 19 प्रभागातून 74 नगरसेवक निवडले जाणार आहेत. गेल्या वेळच्या निवडणुकीप्रमाणेच 1 ते 17 प्रभागात प्रत्येकी 4, तर 18 आणि 19 क्रमांकाच्या प्रभागातून प्रत्येकी 3 नगरसेवक निवडले जाणार आहेत. या रचनेवर हरकती नोंदवण्यासाठी 15 सप्टेंबरपर्यंत मुदत दिली आहे. **नाशिक** जिल्ह्यात मालेगाव महानगरपालिकेत यावेळीही प्रभाग संख्या 21, तर नगरसेवक संख्या प्रत्येकी 4, याप्रमाणे 84 असेल. **नांदेड** महापालिकेच्या 20 प्रभागांमध्ये 81 नगरसेवकांसाठी निवडणूक होईल

**विसर्जन**

गणेशोत्सवाच्या निमित्तानं संपूर्ण राज्यभरात उत्साहाचं वातावरण पाहायला मिळत आहे. दहा दिवसांच्या या चैतन्य पर्वाची अनंत चतुर्दशीला, शनिवारी सांगता होणार आहे. यासाठी ठिकठीकाणच्या पोलीस आणि स्थानिक प्रशासनानं तयारी केली आहे. पुणे पोलिसांनी गणेश विसर्जन मिरवणूकीचं वेळापत्रक जाहीर केलं असून सकाळी साडेनऊ वाजता मानाच्या गणपतींची मिरवणूक सुरू होईल. टिळक पुतळा ते बेलबाग चौकादरम्यान ढोल ताशा पथकांना परवानगी नसेल. प्रत्येक मंडळात एकच ढोल ताशा पथकं असेल. टिळक रस्ता, कुमठेकर रस्ता आणि केळकर रस्त्यावरील विसर्जन मिरवणूक साडेदहा वाजता सुरू होईल, असं  पुणे पोलिसांनी काल सांगितलं.

**आदिवासी**

आदी कर्मयोगी अभियानाच्या अंतर्गत पुण्यात काल जिल्हास्तरीय मार्गदर्शन कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं. पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव खेड, मावळ, हवेली आणि पुरंदर या तालुक्यातील 99 गावं आदिवासी-बहुल आहेत. त्यांच्यापर्यंत 17 विभागांच्या योजना पोहचविण्यासाठी प्रत्येक गटामध्ये 30 प्रशिक्षणार्थी तयार करण्यात आले आहेत.

**हॉकी**

आशिया करंडक हॉकी स्पर्धेत भारत आणि कोरिया यांच्यातील दुसरा सुपर चार फेरीतील सामना बिहारमधील राजगीर क्रिडा संकुलाच्या मैदानावर 2-2 असा बरोबरीत संपला. भारताचा या फेरीतील पुढचा सामना मलेशियासोबत आज संध्याकाळी होणार आहे.

**अपघात-नांदेड**

नांदेड जिल्ह्यात काल झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला तर पस्तीसजण जखमी झाले आहेत. त्यातील चौघांची प्रकृती गंभीर आहे. भोकर तालुक्यातील नांदा इथं एका कारनं ट्रकला धडक दिली. यात तिघांचा मृत्यू झाला; तर देगलूर तालुक्यातील वजूर इथून देगलूरला निघालेली एसटी बस नियंत्रण सुटल्यानं रस्त्याच्या कडेला खड्ड्यात उलटली. यात बसमधील 32 प्रवासी जखमी झाले.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात जोराचे वारे आणि वीजांसह अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. कोकण, मध्य हाराष्ट्राचा घाट प्रदेश आणि विदर्भातही मुसळधार पाऊस पडेल.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.